# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.09.2024 वार – रविवार**

---

**<u>धनखड</u>**

राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उभारण्यात आलेल्या संविधान मंदिराचं लोकार्पण उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज मुंबईतून दूरस्थ पद्धतीनं केलं. पुण्यातील औंध शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत स्थापन करण्यात आलेल्या संविधान मंदिराचं उद्घाटनही यावेळी झालं. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनी या संविधान मंदिराचं उद्घाटन करण्याचा हा क्षण अविस्मरणीय आहे, या मंदिरामुळे राज्यघटनेबद्दल जागृती वाढेल, असं धनखड म्हणाले.

**<u>दिलीपवळसे</u>**

केंद्राच्या सहकार विभागाने आणलेल्या नवीन कायद्यानुसार सहकारी संस्थांना १५१ प्रकारचे विविध व्यवसाय करण्याला परवानगी दिली आहे; संस्थांच्या अध्यक्षांनी आणि संबंधितांनी या योजनांची माहिती घेऊन योजना राबवाव्यात, असं आवाहन राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आज पुण्यात केलं. आंबेगाव तालुक्यातील अवसरी इथल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्यावतीने आयोजित सहकार परिषद आणि बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते.

**<u>अभियंतादिन</u>**

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांचा जन्मदिवस आज देशभरात सर्वत्र अभियंता दिन म्हणून साजरा केला जात आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेनेही विश्वेश्वरैया यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील त्यांच्या प्रतिमेला अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. शहरातील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीही मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांना अभिवादन केलं.

**<u>सहकारी साखर महासंघ</u>**

साखर महासंघाच्या पुढकाराने पुण्यात आज एक बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सात राज्यस्तरीय साखर संघटनांचे प्रतिनिधी, राज्याचे साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार उपस्थित होते. केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या साखर आदेश २०२४मध्ये १५ दुरूस्त्या आहेत, याबाबत साखर उद्योगाकडून २४ सप्टेंबरपर्यंत सूचना, हरकती मागवण्यात आल्या आहेत. देशातील सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांच्या मागण्यांचा एकत्रित अंतिम मसुदा चार दिवसांत तयार करून २२ सप्टेंबरपर्यंत केंद्राला राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्यावतीने देण्यात येणार असल्याची माहिती महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी दिली.

**<u>गुणवंत सहशिक्षक पुरस्कार</u>**

शिक्षकांनी केलेले संस्कार विद्यार्थी कधीही विसरत नाहीम असं मत राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ दिगंबर देशमुख यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. महाराष्ट्र राज्य आणि पुणे शहर शिक्षक लोकशाही आघाडी तसंच पुण्यातील माध्यमिक शिक्षक संघाच्यावतीने आयोजित गुणवंत सहशिक्षक पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी डॉ पी ए इनामदार यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर श्रेणीतील एकंदर 52 जणांना गुणवंत सहशिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**<u>पिकांचं नुकसान</u>**

पुणे जिल्हयात जुलै आणि ऑगस्टमध्ये झालेल्या अतिवृष्टीने अनेक भागांमध्ये पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. या पावसामुळे जिल्हयातील दहा हजारांपेक्षा जास्त शेतक-यांच्या तीन हजार ५०० हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. सर्वाधिक नुकसान पुरंदरमधील शेतक-यांचं झालं आहे.

**<u>आरोग्य कर्मचारी संप</u>**

आरोग्य सेवा उपसंचालकांनी कर्मचा-यांच्या नियमबाह्य बदल्या केल्याचा आरोप करत राज्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांनी १८ सप्टेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत शासन निर्णय रद्द होत नाही तोपर्यंत बेमुदत संप सुरू राहील; संपामुळे आरोग्य सेवेवर परिणाम झाल्यास संपूर्ण जबाबदारी शासनाची असेल असं कर्मचारी संघटनेनं म्हटलं आहे.

**<u>वाहतूकबदल</u>-**

अनंत चतुर्दशीनिमित्त परवा १७ सप्टेंबर रोजी पुणे शहरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. शिवाजी रस्ता, लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, बाजीराव रस्ता, केळकर रस्ता, टिळक रस्ता, शास्त्री रस्ता, जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता, भांडारकर रस्ता, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहेत. तर शहरातील इतर रस्त्यावरील वाहतूक अन्य मार्गाने वळवण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांच्या वाहतूक विभागाने दिली आहे.

**<u>कोरोना</u>**

कोरोनाच्या जागतिक संकटाच्या काळात पुणे महापालिकेच्या विविध विभागांमध्ये काम करत असताना कोरोनाचा संसर्ग होऊन मृत्यू झालेल्या ११ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. कोरोना काळात महापालिकेच्या कायम आस्थापनेवरील 91, रोजंदारीवरील एक आणि कंत्राटी 11 अशा एकंदर 103 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला.

**<u>बाजारसमिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने कांदा, हिरवी मिरची, सिमला मिरची, फ्लॉवर यांच्या भावात वाढ झाली. पालेभाज्यांमध्ये मेथी आणि कोथिंबिरीचे भाव अद्यापही चढेच आहेत. फळ बाजारात पेरू चिकू सिताफळ आणि पपईच्या भावात मोठी घसरण नोंदवण्यात आली. फुल बाजारात फुलांची उच्चांकी आवक झाली. मात्र गुलछडी वगळता सर्वच शोभिवंत फुलांचे भाव पन्नास टक्क्यांनी खाली आले आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज ढगाळ हवामान होतं; पावसाच्या काही हलक्या सरीही आल्या. उद्याही साधारण असंच हवामान असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.